# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org


क्रमांक : बैठक-१८२४/प्र.क्र. ३९६/प्रनिप्रा/११ जुन/२०२५/666 दिनांक : 20 JUN 2025

## :: १०३ व्या बैठकीचे इतिवृत्त ::

**श्री. समीर कुमार बिस्वास, भा.प्र.से. (से.नि.), अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दिनांक ११ जुन, २०२५ रोजी सकाळी ११:३० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **१०३ व्या बैठकीचे इतिवृत्त**,-

सदरील बैठकीस श्री. दिलीप सरदेसाई (भा.प्र.से.), सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य व श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (दूरदृष्यप्रणालीद्वारे) हे बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, २) डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, ३) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. हे अनुपस्थित होते. याबाबत नोंद घेण्यात आली.

तसेच १) डॉ. वाय.सी. साळे, संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे व, २) श्री. महेंद्र कोठावदे, उपकुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे), ३) डॉ. सुशील दुबे, विशेष कार्य अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व ४) श्री. गणेश वामन पाटील, प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय, मुंबई हे विशेष निमंत्रित उपस्थित होते.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

हि बैठक कोरम (Quoram) अभावामुळे अर्धा तास तहकुब करुन त्याच ठिकाणी घेण्यात आली

**विषय क्रमांक १ :** **प्राधिकरणाच्या दिनांक १९/०५/२०२५ व २०/०५/२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत.**

प्राधिकरणाच्या दिनांक १९/०५/२०२५ व २०/०५/२०२५ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त प्राधिकरणाच्या मान. सदस्य यांना पाठवून त्यांचे अभिप्राय प्राप्त करुन घेण्याचे निर्देश देण्यात आले होते. या संदर्भात इतिवृत्ताच्या सुधारणेबाबत कोणतेही अभिप्राय /सुचना नसल्याने, सदरील बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्यात आले.

**विषय क्रमांक २ : प्राधिकरणाच्या दिनांक १९/०५/२०२५ व २०/०५/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.**

**बैठक दिनांक : १९/०५/२०२५**

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १९/०५/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १. | - | प्राधिकरणाच्या दिनांक १९/०५/२०२५ व २०/०५/२०२५ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त. | प्राधिकरणाच्या दिनांक १९/०५/२०२५ व २०/०५/२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त सर्व संबंधितांना अनुक्रमे दिनांक ०२/०६/२०२५ व ०६/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आले होते. |
| २. | ३ | प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळाची पुनर्रचना करणे व प्रवेश मान्यता प्रक्रियेकरिता स्वतंत्र ऑनलाईन पोर्टल तयार करण्याच्या मान्यतेबाबत<br>निर्णय/निर्देश : .......प्रस्तावामध्ये प्रस्तावित केल्यानुसार प्रणाली विश्लेषक हे पद कंत्राटी तत्वावर भरण्यास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. | प्रणाली विश्लेषक पद भरण्याबाबत महाराष्ट्र इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशन लि. मुंबई यांना दिनांक ०९/०६/२०२५ रोजीच्या पत्राने System Admin व Data Entry Operator/ IT Office Assistant अशी ०२ तांत्रिक पदे उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले आहे. |
| ३. | ४ | प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही विभागांचे अधिनियम, २०१५ च्या तरतूदींनुसार नियम मसुदा तयार करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या उपसमितीद्वारे सादर करण्यात आलेल्या अंतरिम अहवाल शासनास सादर करण्याबाबत व उक्त तरतूदींनुसार प्रवेश नियामक प्राधिकरण बैठक विनियम मसुदयास मान्यतेबाबत तसेच उपसमितीस अहवाल सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत<br>निर्णय/निर्देश : क) उपसमितीस दिनांक १८/०३/२०२५ पासून पुढील तीन महिने दिनांक १७/०६/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. या समितीने अधिनियमांतर्गत तक्रार निवारण पध्दती व लेखा विषयक कार्यपध्दतीचे विनियम मसुदा या मुदतीत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. | (१) लेखे, वार्षिक अहवाल मसूदा शासनास मान्यतेसाठी पाठविण्यात आला असुन, शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहुन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून कामकाज करण्यात येईल.<br>(२) बैठकीचे विनियमास मान्यता दिले गेले असल्याने या मंजुर विनियमनानुसार प्राधिकरणाच्या बैठकीचे कामकाज करण्यात येत आहे.<br>(३) अधिनियम, २०१५ च्या अंतर्गत नियम व विनियम मसुदा तयार करण्यासाठी नेमण्यात आलेल्या उपसमितीस दिलेल्या मुदतवाढी दिनांक १७/०६/२०२५ रोजी पर्यंत नियम व विनियम मसुद्याचे अंतिम प्रारुप सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. |
| ४. | ५ | प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांना सामाईक प्रवेश परीक्षा, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया, वॉर-रुम व प्रवेश मान्यता प्रक्रिया या कामकाजांकरिता मानधन अदा करण्याबाबत. | प्राधिकरणाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात आली आहे. |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १९/०५/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | निर्णय/निर्देश : प्रस्तूत प्रकरणी प्रस्तावित केल्यानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांना सामाईक प्रवेश परीक्षा (शैक्षणिक वर्ष २०२५-२६), केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (शैक्षणिक वर्ष २०२४-२५) व वॉर-रुम (शैक्षणिक वर्ष २०२५-२६) या कामकाजांकरिता मानधन अदा प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मान्यता देण्यात आल्यानुसार आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष व सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी पुढील कार्यवाही करावी. | |
| ५. | ६ | प्रवेश नियामक प्राधिकरणाकरिता Hycross ZX (o) Hybrid ७ STR हे नविन वाहन खरेदी करण्याबाबत<br>निर्णय/निर्देश : सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी प्रस्तावित केल्यानुसार प्रवेश नियामक प्राधिकरणाकरिता Toyota Innova Hycross ZX (o) Hybrid ७ STR हे नवीन वाहन खरेदी करण्यास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच पूर्वीचे वाहन क्रमांक MH-०२-AK-०२७१ हे आवश्यक त्या दुरुस्तीसह कार्यालयासाठी वापरण्याचे निर्देश देण्यात आले. | याप्रकरणी नवीन वाहन खरेदी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.<br>अध्यक्ष<br>प्रवेश नियामक प्राधिकरण,<br>महाराष्ट्र राज्य |
| ६. | ७ | प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कंत्राटी तत्वावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वेतन वाढीबाबत<br>निर्णय/निर्देश : ..... कर्मचाऱ्यांच्या माहे डिसेंबर २०२४च्या वेतनामध्ये १० टक्के वाढ करण्यास प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे. सदरची वेतनवाढ प्रपत्रात कर्मचाऱ्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या दिनांकापासून लागू राहिल. मान्य वेतनवाढी व्यतिरिक्त अन्य कोणतेही वेतन लागू राहणार नाही. ही वेतनवाढ खालील अटी व शर्तीवर लागु राहील,-<br>१) या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे दर सहा महिन्यांनी कार्य मुल्यांकन करण्यात यावे.<br>२) ज्या कर्मचाऱ्यांचे कार्यमुल्यांकन "ब" दर्जापेक्षा कमी असेल अशा कर्मचाऱ्यांची देण्यात आलेली वेतनवाढ त्या दिनांकापासून स्थगित करण्यात येईल. | प्राधिकरणाच्या निर्णयानुसार कार्यमुल्यांकन अहवाल प्राप्त करण्यात येत आहेत. त्यास अधिन राहून १/०१/२०२५ पासुन १०% वेतन वाढ देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.<br>प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष कार्यालयात कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे प्रमाण परिमिती (Parameters) विहित करुन कार्यमुल्यांकन अहवाल त्वरित घेण्यात यावेत व त्याचा अनुपालन अहवाल प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्यात यावा , असे निर्देश देण्यात आले. |

बैठक दिनांक : २०/०५/२०२५

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक २०/०५/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १. | १ | प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई या दोन्ही कार्यालयांशी संबंधित मुंबई, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी उच्च न्यायालयातील न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी पॅनलवरील नियुक्त वकीलांच्या शुल्क वाढीबाबत (संदर्भ प्राधिकरणाच्या दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील विषय बाब क्रमांक १४ वरील निर्देश)<br>निर्णय/निर्देश : ......विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र. Meeting-GPH-२०२३/C.R.२९/D-१४ dated ३०/१०/२०२३ नुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्या वकीलांच्या पॅनलवरील वकिलांना खालील प्रमाणे मोबदला दरांस मान्यता देण्यात आली. सदरचे मान्यता देण्यात आलेले दर दिनांक ०१/०५/२०२५ पासूनच्या न्यायालयीन प्रकरणांना लागु राहतील. त्यानुषंगाने, सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी या संदर्भात पुढील कार्यवाही करावी. | या प्रकरणी प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयाबाबत कार्यालयाच्या विधी शाखेकडन प्राधिकरण व राज्य सीईटी कक्षाच्या पॅनवरील सर्व वकिलांना अवगत करण्याची कार्यवाही सुरु आहे. |
| २. | २ | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये के.डी.एम्.जी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, शिरपुर, धुळे येथे व्यावसायिक पदवी होमिओपॅथी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. विश्वनाथ सत्यवान माळी या विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबत मा. उच्च न्यायालयाचे, संभाजीनगर खंडपीठ येथे दाखल याचिका क्र. १९०४/२०२५ मधील दिनांक १२/०२/२०२५ रोजीचे पारित आदेश (संदर्भ प्राधिकरणाच्या दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील विषय बाब क्रमांक १२ वरील निर्देश) | के.डी.एम्.जी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, शिरपुर, धुळे यांना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी होमिओपॅथी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. विश्वनाथ सत्यवान माळी यांच्या प्रवेश प्रकरणी महाविद्यालयास रु.१ लाख दंड आकारुन प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली आहे याबाबत कळविण्यात येत आहे. |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक २०/०५/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | निर्णय : के.डी.एम्.जी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, शिरपुर, धुळे येथील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी होमिओपॅथी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. विश्वनाथ सत्यवान माळी यांच्या प्रवेशास, महाविद्यालयास रु.१ लाख दंड आकारुन प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. | |
| ३. | ३ | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये दयानंद ईन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, लातुर PH२५७७ या महाविद्यालयात प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेशित कु. इनामदार सय्यदा आयेशा मुकतेदार अली या विद्यार्थिनीने प्रवेश मान्यतेबाबत (संदर्भ प्राधिकरणाच्या दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील विषय बाब क्रमांक ०६ वरील निर्देश).<br>निर्णय : कु. इनामदार सय्यदा आयेशा मुकतेदार अली या विद्यार्थिनीच्या पालकांनी दिनांक २४/०१/२०२५ रोजीच्या Restoration Application: U/O - ९ Rule - ४ of Civil Procedure Code, १९०८ या विषयाच्या अर्जान्वये सादर केलेल्या मा. सर्वोच्च न्यायालयाचे Suo Motu Writ Petition (C) No. ३ of २०२० मधील निर्देशास अनुसरुन, कु. इनामदार सय्यदा आयेशा मुकतेदार अली यांचा जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरिता झालेला विलंब क्षमापित करण्यात आला. त्या अनुषंगाने, दयानंद ईन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, लातुर या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये व्यावसायिक प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास ACAP जागेवर प्रवेशित कु. इनामदार सय्यदा आयेशा मुकतेदार अली यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. | याप्रकरणी, दयानंद ईन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, लातुर PH२५७७ या महाविद्यालयास कु. इनामदार सय्यदा आयेशा मुकतेदार अली या विद्यार्थिनीच्या प्रवेश मान्यतेबाबत कळविण्यात येत आहे.<br><br>अध्यक्ष<br>प्रवेश नियामक प्राधिकरण,<br>महाराष्ट्र राज्य |

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक २०/०५/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ४. | ४ | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंतची प्रलंबित प्रकरणे फेरपडताळणी करुन प्राधिकरणाच्या निर्णयाकरिता सादर करणे (संदर्भ प्राधिकरणाच्या दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ९,१० व ११ मधील निर्देश).<br>निर्णय/निर्देश: बैठकीतील निर्णयानुसार प्रपत्र अ मधील प्रवेशांना मान्यता प्रदान करण्यात आली, प्रपत्र-ब मधील महाविद्यालयांना दंड आकारुन प्रवेशास मान्यता देण्यात आली, प्रपत्र-क मधील महाविद्यालयांना खुलासा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले, प्रपत्र-ड मधील महाविद्यालयांतील प्रवेशास मान्यता नाकारण्यात आली, प्रपत्र-इ मधील महाविद्यालयांतील प्रवेश रद्द करण्यात आले. | याप्रकरणी महाविद्यालयानिहाय प्राधिकरणाचा निर्णय कळविण्यात येत आहे. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्यात येईल. |
| ५. | ५ | सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियांसाठी तंत्रशिक्षण विभागातील प्रवेश पक्रियेसाठी अस्तित्वात असलेल्या Facilitation Center प्रमाणे इतर विभागातील प्रवेश प्रक्रियेसाठी विभागीय /जिल्हा / तालुका स्तरावर नव्याने Facilitation Center उभारण्याबाबत विचार विनिमय करणे<br>निर्देश : सदर विषय पुढील बैठकीत सादर करण्यात यावे, असे निर्देश देण्यात आले. | या बैठकीत विषयक क्रमांक ०५ वर चर्चेसाठी /निर्णयासाठी ठेवण्यात आले आहे. |

**<u>विषय क्रमांक ३ :</u>** **<u>सन २०२५-२६ साठी प्रवेश नियामक प्राधिकरणाचे (सीईटी कक्षासह) अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक अवकनार्थ व मान्यतेकरिता सादर करणे.</u>**

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या कार्यालयांचे सादर करण्यात आलेल्या सन २०२५-२६ साठीचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाचे अवलोकन करण्यात आले. त्यावर सांगोपांग चर्चा करण्यात येऊन सदरचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक योग्य ते बदल करुन फेरसादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक ४:** **सन २०२३-२४ पर्यंतचे लेखे विषयक Audit Report अवलोकनार्थ व मान्यतेकरिता सादर करणे.**

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचे सादर करण्यात आलेले सन २०२३-२४ पर्यंतचे अंतर्गत लेखा परीक्षण (Audit Report) अहवालाचे अवलोकन करण्यात आले. Audit Report मधील लेखा परीक्षकांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांनुसार व त्यांनी नोंदविलेल्या निरीक्षण/ मतानुसार मुद्देनिहाय अहवाल प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश दिले.

**विषय क्रमांक ५ :** **सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियांसाठी तंत्रशिक्षण विभागातील प्रवेश प्रक्रियेसाठी अस्तित्वात असलेल्या Facilitation Center प्रमाणे इतर विभागातील प्रवेश प्रक्रियेसाठी विभागीय /जिल्हा / तालुका स्तरावर नव्याने Facilitation Center उभारण्याबाबत विचार विनिमय करणे.**

सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी याबाबत सादर केलेल्या प्रस्तावांवर सांगोपांग चर्चा करण्यात आली व त्यानुसार पुढील प्रमाणे बाबी प्राधिकरणास सादर करण्यात आल्या.

१. अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी सामाईक प्रवेश परीक्षा घेण्यात येतात व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येतात.

२. सद्यस्थितीमध्ये तंत्रशिक्षण विभागा अंतर्गत असणाऱ्या पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी Facilitation Center अस्तित्वात आहेत. या केंद्रामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी (CAP) नोंदणी करताना उमेदवारांच्या कागदपत्रांची छाननी करण्यात येऊन पात्रतेची शहानिशा करण्यात येते.

३. तंत्र शिक्षण संचालनालया अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी एकुण ८९५ Facilitation Center निर्माण करण्यात आले होते. या Facilitation Center वर एकूण २,९४,६३५ विद्यार्थ्यांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी (CAP) नोंदणी व कागदपत्रे तपासण्याचा लाभ घेतलेला आहे, तसेच १,३३,५३५ विद्यार्थ्यांनी e-scrutiny च्या माध्यमातून कागदपत्रे पडताळणीबाबतचा लाभ घेतलेला आहे.

४. Physical Facilitation Center साठी प्रति विद्यार्थी रु. ५०/- प्रमाणे संबंधित Facilitation Center असणाऱ्या महाविद्यालयांस रक्कम अदा करण्यात येते.

५. या Facilitation Center च्या माध्यमातून प्रवेशाच्छूक विद्यार्थी व त्यांचे पालक यांना संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची संपूर्ण माहिती देण्यात येते तसेच ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी (CAP) नोंदणी करणे, कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करण्याबाबतचे तांत्रिक माहितीसह मार्गदर्शन करण्यात येते. या प्रकारची सुविधा इतर विभागातील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी उपलब्ध नाही.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,

६. सदरील Facilitation Center वर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता उमेदवारांच्या पात्रतेस आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रांची छाननी व पडताळणी करणे, कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करणे, मार्गदर्शन करणे याबाबतची सुविधा असणे आवश्यक आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता तंत्रशिक्षण विभागातील प्रवेश प्रक्रियेसाठी अस्तित्वात असलेल्या Facilitation Center प्रमाणे इतर विभागातील प्रवेश प्रक्रियेसाठी विभागीय / जिल्हा / तालुका स्तरावर नव्याने Facilitation Center उभारण्याबाबत बैठकीमध्ये उपस्थित संचालक व संचालक प्रतिनिधी यांच्यासोबत चर्चा करण्यात आली.

<u>प्राधिकरणाचा निर्णय.-</u>

तंत्रशिक्षण विभागातील प्रवेश प्रक्रियेसाठी अस्तित्वात असलेल्या Facilitation Center प्रमाणे इतर विभागातील प्रवेश प्रक्रियेसाठी विभागीय/जिल्हा/तालुका स्तरावर Facilitation Center उभारण्याबाबत एकमत झाले. Facilitation Center उभारण्यासाठीची प्राथमिक तयारी करण्यासाठी संबंधित विभागातील महाविद्यालयांकडून इच्छापत्र भरुन घेण्याचे निर्देश देण्यात आले.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून Facilitation Center साठी तयार करण्यात आलेल्या Important Instructions to Facilitation Center व The Role & Requirements of Facilitation Center प्रमाणे Facilitation Center साठी इच्छुक महाविद्यालयांकडून माहिती एकत्रित करुन, त्याचा अहवाल संबंधित संचालकांकडून प्राप्त करुन घेण्याचे निर्देश देण्यात आले.

उपरोक्त प्रमाणे तंत्रशिक्षण संचालनालय वगळून इतर संचालनालयांकडून Facilitation Center बाबतची माहिती घेण्यासाठी संचालकांना त्वरित कळविण्यात यावे.

**<u>विषय क्रमांक ६</u> : <u>अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी वेळापत्रक अवलोकनार्थ व मान्यतेकरिता सादर.</u>**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९ (५) च्या तरतूदींनुसार प्रवेश नियामक प्राधिकरण, संबंधीत संचालक व व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये/संस्था यांनी प्रवेशाबाबत पार पाडण्यात येणारी कार्ये नमूद केलेली आहेत, सदर तरतूदींनुसार,-

*(एक) प्रत्येक विनाअनुदानित संस्था प्रवेशाच्या <u>अंतिम दिनांकापासून १५ दिवसांच्या आत</u>, संबंधीत संचालनालयाला "प्रवेश मंजूरीचे प्रस्ताव सादर करील,*

*(दोन) प्रत्येक संस्था संबंधीत संचालनालयाने प्रमाणित केलेले असे प्रस्ताव, अशा <u>प्रमाणनाच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या कालमर्यादेच्या आत</u> प्रवेश नियामक प्राधिकरणाला सादर करील,*

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

*(तीन) प्रवेश नियामक प्राधिकरण, संस्थांकडून मिळालेल्या अशा प्रस्तावांची प्रत्येक वर्षाच्या ३१ जानेवारी पूर्वी छाननी करील आणि त्यांना मान्यता देईल.*

उपरोक्त कायद्यातील तरतुदींनुसार कामकाज करताना प्रवेश मान्यता प्रस्ताव विहित कालावधीत प्राधिकरणाकडे प्राप्त न झाल्यामुळे प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी तत्कालीन प्रवेश नियामक प्राधिकरणाने दिनांक २७/०७/२०१६ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ३ अन्वये खालील प्रमाणे निर्णय घेतला होता,-

"In view of the above, after deliberations, the Authority decides to remind to the Higher and Technical Education Department to comment upon the issue of proposals of approval of admissions received after ३१st January, २०१६ at the earliest. After receipt of the same, it be placed before the Authority for its consideration. Office to inform accordingly."

प्राधिकरणाच्या उक्त निर्णयास अनुसरुन कार्यालयाच्या दिनांक २१/१०/२०१६ रोजीच्या पत्रान्वये शासनास अवगत करण्यात आले व तद्नुषंगाने प्रस्तूत प्रकरणी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक ८/०५/२०१७ रोजीच्या पत्रातील परिच्छेद क्रमांक (४) नुसार खालील प्रमाणे निर्देश प्राधिकरणास दिले आहेत,-

"........ महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक विधी मंडळाच्या सन २०१६ च्या हिवाळी अधिवेशनात पारीत करुन घेण्यासाठी सादर करण्यात आले होते. सदर विधेयक विनासीीत पारीत झाले आहे, परंतू विधानपरिषदेत ३ महिन्याचा कालावधी होऊनही पारीत झालेले नसल्याने विधी मंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानसभेत दिनांक ५ एप्रिल, २०१७ रोजी दुसऱ्यांदा पारित करुन विधानपरिषदेत मान्यतेसाठी पाठविले आहे. तथापि, उपरोक्त अधिनियमातील सुधारणा करण्यासंदर्भातील विधेयकास विधी मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर यथायोग्य पध्दतीने अधिसूचना मान्य होण्याच्या अधीन राहून वर नमूद प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव मान्य करण्याबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाने योग्य ती कार्यवाही करावी."

अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) (तीन) नुसार व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना प्रत्येक वर्षाच्या ३१ जानेवारी पूर्वी छाननी करुन प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. परंतू सन २०१९ मध्ये जागतिक कोरोना -१९ विषाणूंच्या संक्रमणामुळे सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक विस्कळीत झाले होते. तसेच काही अभ्यासक्रमांच्या प्रवेश परिक्षा हया केंद्र सरकारच्या संबंधित विभागांकडून घेतल्या जातात व त्यांची प्रवेश प्रक्रिया ही देखील दीर्घकाळ सुरु राहिल्याने त्यांचे प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक अधिनियम २०१५ च्या तरतूदींच्या अनुषंगाने सुसंगत होत नाही.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

शासनाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंतच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. परंतू अद्याप या संदर्भात शासनाकडून अधिनियमात संबंधित बदल करुन पुढील आदेश प्राप्त झालेले नाहीत.

अधिनियम, २०१५ च्या अंतर्गत येणाऱ्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया व कार्यपध्दती एक-समान असावी. तसेच, शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमांनुसार असलेल्या प्रवेश बंद दिनांकाचा विचार करता, दोन भागात प्रवेश मान्यता प्रस्ताव पडताळणी व प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्याचे वेळापत्रक निश्चित करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

**<u>प्राधिकरणाचा निर्णय.-</u>**

या अनुषंगाने विषयांकित प्रकरणी सांगोपांग चर्चा करुन, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम ९ (५) मधील तरतूदी व शासनाच्या दिनांक ०८/०५/२०१७ रोजीच्या पत्राने कळविल्यानुसार, अधिनियमातील सुधारणा करण्यासंदर्भातील विधेयकास विधी मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर यथायोग्य पध्दतीने अधिसूचना मान्य होण्याच्या अधीन राहून वर नमूद प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव मान्य करण्याबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाने योग्य ती कार्यवाही करावी, या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्यासाठी अभ्यासक्रमांच्या प्रवेश बंद दिनांकानंतर प्राधिकरणाकडील प्रवेश मान्यतेची प्रक्रिया खालील दोन गटांत दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यास मान्यता देण्यात आली.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्यासाठीचे प्रस्तावित वेळापत्रक

<u>भाग - १ (Group - I)</u>

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | व्यावसायिक **<u>तंत्र शिक्षण, कृषी शिक्षण व कला शिक्षण</u>** अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यता प्रक्रियेसाठी गृहित धरण्यात आलेली प्रवेश बंद तारीख | ३१/१०/२०२५ |
| २. | महाविद्यालयांनी प्रवेश मान्यता प्रस्ताव संबंधित संचालकांकडे सादर करण्याचे अंतिम तारीख | १५/११/२०२५ |
| ३. | संबंधित संचालकांनी प्रमाणित करुन प्रवेश पडताळणी / छाननी प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम तारीख | ३१/१२/२०२५ |
| ४. | संचालकांनी छाननी / पडताळणी करुन प्रमाणित केलेले प्रस्ताव महाविद्यालयांमार्फत प्राधिकरणास सादर करण्याची अंतिम तारीख | २८/०२/२०२६ |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

भाग – २ (Group – II)

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | व्यावसायिक वैद्यकीय शिक्षण, आयुष शिक्षण व उच्च शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यता प्रक्रियेसाठी गृहित धरण्यात आलेली प्रवेश बंद तारीख | ३१/१२/२०२५ |
| २. | महाविद्यालयांनी प्रवेश मान्यता प्रस्ताव संबंधित संचालकांकडे सादर करण्याचे अंतिम तारीख | १५/०१/२०२६ |
| ३. | संबंधित संचालकांनी प्रमाणित करुन प्रवेश पडताळणी / छाननी प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम तारीख | २८/०२/२०२६ |
| ४. | संचालकांनी छाननी / पडताळणी करुन प्रमाणित केलेले प्रस्ताव महाविद्यालयांमार्फत प्राधिकरणास सादर करण्याची अंतिम तारीख | ३०/०४/२०२६ |

सदरचे वेळापत्रक सर्व संबंधित संचालक व संबंधित सर्व महाविद्यालये यांना कळविण्याचे निर्देश देण्यात आले.

**विषय क्रमांक ७ :** **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंतची प्रलंबित प्रकरणे फेरपडताळणी करुन प्राधिकरणाच्या निर्णयाकरिता सादर करणे (संदर्भ प्राधिकरणाच्या दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ९,१० व ११ मधील निर्देश.**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंत प्राप्त झालेल्या व तत्कालीन मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या स्तरावर अमान्य झालेल्या पुनर्विलोकन याचिका प्रकरणी संबंधित महाविद्यालये व विद्यार्थी यांनी सादर केलेल्या समर्पक कागदपत्रांच्या अनुषंगाने पुनश्च शहानिशा/तपासणी करुन पात्रतेबाबतचा अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करण्याच्या निर्देशांकरिता मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.९, १० व ११ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे.

या संदर्भात नमूद त्रुटींबाबत बहुतांशी महाविद्यालयांनी त्रुटींच्या पूर्ततेबाबत आवश्यक कागदपत्रे प्राधिकरणास सादर केली असल्याची बाब प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. परंतू याबाबत तपासणी / छाननी होऊन प्राधिकरण स्तरावर निर्णय होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

या प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयांकडून सादर केलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने सदरील त्रुटींची तपासणी / छाननी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या स्तरावर करुन त्याचा स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याबाबत त्यासाठी खालील प्रमाणे मागदर्शक तत्वांचा वापर करण्याचे निर्देश दिले होते,-

१) संबंधित संचालक अथवा उपसमितीने दर्शविलेल्या त्रुटींचे अवलोकन करुन नस्ती तपासणे.

२) उपरोक्त कामकाज शैक्षणिक वर्ष /अभ्यासक्रम निहाय प्राधान्यक्रम ठरवून सादर करणे.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

३) सदरील त्रुटींस अनुसरुन महाविद्यालयांनी सादर केलेला समर्पक खुलासा व कागदपत्रे / प्रमाणपत्रांची तपासणी / छाननी करणे,

४) संबंधित प्रवेश प्रकरणी प्राप्त कागदपत्रांनुसार त्रुटींची पूर्तता पूर्ण होऊन विहित केलेल्या नियमांनुसार विद्यार्थी प्रवेशास पात्र /अपात्रतेबाबत खातरजमा करणे,

५) ज्या प्रवेश प्रकरणी त्रुटींची पूर्तता सादर केली नसल्याचे अथवा अपूर्ण माहिती सादर केली असल्याचे निदर्शनास आल्यास, तसा अहवाल सादर करणे,

६) प्राप्त माहिती / कागदपत्रांच्या आधारे पात्र / अपात्र विद्यार्थ्यांचा शैक्षणिक वर्ष / अभ्यासक्रम / महाविद्यालय / विद्यार्थी निहाय अहवाल सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी मा. प्राधिकरणाच्या बैठकीत उचित निर्णयाकरिता सादर करणे,

७) ज्या प्रवेशांबाबत विद्यार्थी राखीव प्रवर्गानुसार पात्रतेचे निकष पूर्ण करीत नसेल परंतू प्रवेशित सवंर्ग / प्रवर्गानुसार विद्यार्थी प्रवेशास पात्र ठरत असल्यास, योग्य त्या शिफारशीसह अहवाल प्रवेश मान्यतेकरिता प्राधिकरणास सादर करणे,

८) ज्या प्रवेश प्रकरणी विद्यार्थी प्रवेशित संवर्ग / प्रवर्गानुसार पात्रतेचे निकष पूर्ण करीत नसल्यास, संबंधीत प्रकरणे प्राधिकरण स्तरावर अंतिम निर्णय पारीत करुन निकाली काढण्यासाठी कारणांसह सादर करणे.

उपरोक्त प्रमाणे सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी प्राधान्य क्रमाने छाननी / पडताळणी / तपासणी करुन त्याचा अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी तीन महिन्यांच्या आत सादर करावा, असे निर्देश देण्यात आले होते.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

दिनांक २०/०५/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देशानुसार, उर्वरित प्रकरणी महाविद्यालयांकडून प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने, विद्यार्थ्यांच्या त्रुटीबाबतच्या कागदपत्रांची पुर्तता होत असल्याची प्रकरणनिहाय शहानिशा/तपासणी करुन त्याचा अहवाल पुढील प्रमाणे सादर करण्यात आला,-

| अ. क्र. | विभाग | प्राधिकरणाच्या दिनांक २०/०५/२०२५ रोजीच्या बैठकीतील शिल्लक प्रकरणे (विद्यार्थी संख्या) | | | प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत मान्यतेसाठी शिफारस करण्यात येणारी एकुण प्रकरणे (विद्यार्थी संख्या) | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुद्दा क्र. ९ | मुद्दा क्र. १० | मुद्दा क्र. ११ | मुद्दा क्र. ९ | मुद्दा क्र. १० | मुद्दा क्र. ११ | |
| १ | उच्च शिक्षण | २१२८ | १३ | ७४ | १७७ | ० | १९ | १९६ |
| २ | तंत्र शिक्षण | ३२२ | ३५ | १२ | २५८ | १ | ११ | २७० |
| ३ | वैद्यकिय शिक्षण | १७८ | २० | ४७ | १६३ | ० | ० | १६३ |
| ४ | आयुष शिक्षण | ८५ | २८ | ६३ | ६६ | ५ | ६३ | १३४ |
| एकुण | | २७१३ | ९६ | १९६ | ६६४ | ६ | ९३ | ७६३ |

उपरोक्त तक्त्यात नमूद अहवाल मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये मान्यतेस सादर करण्यात आला. अहवालातील महाविद्यालयनिहाय विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी सविस्तर चर्चा करुन खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निर्णय घेण्यात आले,-

| अ. क्र. | विभाग | प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करण्यात आलेली प्रकरणे | प्राधिकरणाच्या बैठकीतील निर्णयानुसार निपटारा करण्यात आलेली प्रकरणे | | | | | शिल्लक प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मान्यता देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | दंडाच्या कारवाईसह मान्यता दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | मान्यता न दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | एकुण | |
| | | | प्रपत्र-अ | प्रपत्र-ब | प्रपत्र-क | प्रपत्र-ड | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | तंत्रशिक्षण | २७० | ~~२४८~~ 243 | ०० | ~~०२~~ 07 | १८ | २६८ | ०२ |
| २ | उच्चशिक्षण | १९६ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | १९६ |
| ३ | वैद्यकिय शिक्षण | १६३ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | १६३ |
| ४ | आयुष शिक्षण | १३४ | ६७ | ०३ | ०० | ०० | ७० | ६४ |
| एकुण | | ७६३ | ~~३१५~~ 310 | ०३ | ~~०२~~ 07 | १८ | ३३८ | ४२५ |

<u>प्राधिकरणाचा निर्णय,-</u>

१. उपरोक्त तालिकेतील स्तंभ क्र. ४ (प्रपत्र-अ) मध्ये नमूद विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संचालकांच्या तपासणी अहवालानुसार व महाविद्यालयाने त्रुटीसंदर्भात सादर केलेल्या कागदपत्रानुसार प्रवेशांना मान्यता देण्यात येत आहे. प्रवेश मान्यतेबाबतचा निर्णय संबंधितांना कळविण्यात यावा.

२. तालिकेतील स्तंभ क्र. ५ (प्रपत्र-ब) मध्ये नमूद विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी महाविद्यालयाने कागदपत्रांच्या त्रुटींची पुर्तता विहित कालावधीमध्ये न केल्यामुळे <u>संबंधित महाविद्यालयांना रुपये एक लाख दंड आकारुन प्रवेशांना मान्यता देण्यात येत आहे</u>. महाविद्यालयांनी सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा "६०२४९४८१३२१" (IFSC Code : MAHB०००३१०) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

३. तालिकेतील स्तंभ क्र. ६ (प्रपत्र-क) मध्ये नमूद विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी महाविद्यालयांनी आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यामुळे सदर प्रवेशांना मान्यता नाकारण्यात येत आहे.

४. तालिकेतील स्तंभ क्र. ७ (प्रपत्र-ड) मध्ये नमूद विद्यार्थ्यांनी महाविद्यालय स्तरावर प्रवेश रद्द करण्यात आले आहेत.

५. तालिकेतील स्तंभ क्र. ९ मध्ये नमूद विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत प्राधान्याने मान्यतेसाठी सादर करण्यात यावे.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक ८ :** **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

याबाबत पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश दिले.

**विषय क्रमांक ९ :** **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ए.सी.पी.एम. चे वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी यांच्या प्रवेश मान्यतेबाबत. (Discrepancy - Candidate was not registered with State CET Cell) - संदर्भ प्राधिकरणाच्या दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ३))**

प्राधिकरणाच्या दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये के ए.सी.पी.एम.चे वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी यांच्या प्रवेश प्रकरणी सुनावणी घेण्यात आली.

सदरील सुनावणी महाविद्यालयाच्या वतीने श्री. वाल्मिक सुरेश जाधव, लिपिक, ए.सी.पी.एम.चे वैद्यकीय महाविद्यालय, धुळे व संबंधित विद्यार्थी डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देशानुसार महाविद्यालयाने दिनांक ०९/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये त्यांचा खुलासा सादर केला आहे. सदरील खुलाशातील नमुद बाबी खालील प्रमाणे,-

- डॉ. श्रीराम कुलकर्णी या विद्यार्थ्यांस शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये एम.एस. ऑर्थोपेडीक्स या विषयामध्ये अनिवासी भारतीय कोटयातून रिक्त असलेल्या जागेवर संस्था स्तरावरुन प्रवेश देण्यात आला होता.
- पदव्युत्तर अभ्याक्रमाच्या अंतिम दिवशी (दिनांक १४ जानेवारी २०२३) संस्थेमध्ये रिक्त जागांची स्थिती खालील प्रमाणे होती.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एकुण रिक्त जागा (०३) | : | ०१ = MS Orthopedic |
| | | : | ०१ = MS Pathology |
| | | : | ०१ =MD Microbiology |

- एम.एस. ऑर्थोपेडीक्स या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या रिक्त असलेल्या ०१ जागेकरीता एकूण ०३ विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते.

| | |
|---|---|
| १) | बागडे मोहित जयप्रकाश - selected but not joined |
| २) | कुलकर्णी श्रीराम राघवेंद्र - Eligible but not register with State CET-Cell due to technical reason |
| ३) | येडवार विशाल भुजंगराव - Not eligible |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

- डॉ. कुलकर्णी यांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता विहित नियमालीनुसार सीईटी कक्षाकडे तांत्रिक कारणामुळे नोंदणी प्रक्रिया केलेली नव्हती. याबाबत सीईटी कक्षास दिनांक १४/०१/२०२३ रोजीच्या ईमेलद्वारे परवानगी मागितल्याचे नमूद केले आहे.

- डॉ. कुलकणी यांनी केंद शासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या Medical Council Committee (MCC) यांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली होती, त्याबाबतची आवश्यक कागदपत्रे सादर केले आहेत.

- डॉ. कुलकर्णी यांनी प्रवेशासाठी आवश्यक असलेली सर्व प्रमाणपत्रे संस्थेमध्ये प्रवेशाचे वेळी सादर केली होती. तसेच प्रवेशाचे वेळी प्रवेश शुल्क रु. ३३,००,०००/- + रु. १,००,०००/- (कॉशन मनी) असे एकूण रु. ३४,००,०००/- इतक्या रक्कमेचा भरणा केला आहे.

तसेच, सुनावणीसाठी उपस्थित महाविद्यालयाच्या प्रतिनिधी व विद्यार्थी यांनी खालील वस्तुस्थिती सादर केली.

- संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिये दरम्यान महाविद्यालयाकडे एकुण तीन जागा रिक्त होत्या - ०१ = MS Orthopedic, ०१ = MS Pathology, ०१ =MD Microbiology.
- तीन रिक्त जागांपैकी MS Orthopedic या जागेकरिता ०३ अर्ज प्राप्त झाले, याबाबतचा तपशील पुढील प्रमाणे,-

| | |
|---|---|
| १) | बागडे मोहित जयप्रकाश - selected but not joined |
| २) | कुलकर्णी श्रीराम राघवेंद्र - Eligible but not register with State CET-Cell due to technical reason |
| ३) | येडवार विशाल भुजंगराव - Not eligible |

- डॉ. कुलकर्णी यांनी नोंदणी प्रक्रिया पुर्ण केली नाही, याबाबत सीईटी कक्षास अवगत केले असल्याचे महाविद्यालय प्रतिनीधींनी नमूद केले.

- डॉ. कुलकर्णी हे त्यांच्या नीट-पीजी २०२२ च्या प्रवेश परीक्षेच्या प्राप्त गुण २२५/८०० नुसार पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पात्र होते

- तथापि, जागा रिक्त राहू नये व महाविद्यालयाचे नूकसान होऊ नये, ही बाब विचारात घेता डॉ. कुलकर्णी यांना प्रवेश देण्यात आला.

- सद्यस्थितीमध्ये संबंधित विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित व वरील सर्व परिस्थितीचा सहानुभूतीपुर्वक विचार करता, संबंधित विद्यार्थ्याच्या प्रवेश मान्य करण्याची विनंती करण्यात येत आहे.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

<u>प्राधिकरणाचा निर्णय.-</u>

विषयांकित प्रकरणी, सांगोपांग चर्चा करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये ए.सी.पी.एम.चे वैद्यकीय महाविद्यालय, धुळे यांनी पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमास डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी यांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी नोंदणी केली नसताना सुद्धा संस्थास्तरावरील रिक्त जागेवर प्रवेश दिला. महाविद्यालयाने सदर विद्यार्थ्याकडून प्रवेशाचे वेळी प्रवेश शुल्क रु. ३३,००,०००/- + रु. १,००,०००/- (कॉशन मनी) असे एकूण रु. ३४,००,०००/- इतकी रक्कम घेतली असल्याचे त्यांच्या खुलासा पत्रामध्ये नमूद केले आहे. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी नोंदणी न केलेल्या उमेदवारास महाविद्यालयातील जागा रिक्त राहू नये व महाविद्यालयाचे आर्थिक नूकसान होऊ नये म्हणून प्रवेश दिला असल्याचे उपस्थित प्रतिनिधीकडून सांगण्यात आले. नोंदणीकृत उमेदवारांमधून प्रवेश न करता महाविद्यालयातील जागा रिक्त राहू नये व महाविद्यालयाचे आर्थिक नुकसान होऊ नये या हेतूने नोंदणी नसलेल्या उमेदवारास प्रवेश देणे, हि बाब प्रवेश नियमावलीच्या विरुद्ध असल्याचे स्पष्ट होते.

महाविद्यालयाने सादर केलेल्या संस्था स्तरावरील प्रवेशासाठी प्राप्त अर्जांपैकी, डॉ. बागडे मोहित यांची गुणवत्तेनुसार संस्था स्तरावरील रिक्त जागेकरिता निवड झाली होती, तथापि त्यांनी प्रवेश घेतला नाही. तसेच शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या दस्तऐवजाप्रमाणे डॉ. बागडे यांना अन्य कुठेही प्रवेश झालेला नाही, असे श्री. नर, परिक्षा समन्वयक, वैद्यकीय शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी प्राधिकरणास अवगत केले. तसेच महाविद्यालयाने सादर केलेल्या माहितीनुसार डॉ. येडवार विशाल हा विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र नव्हता,

विद्यार्थ्याने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रवेश घेतला आहे. त्यामुळे त्याचे शैक्षणिक हित लक्षात घेता, डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी यांचा प्रवेश मान्यतेचा निर्णय घेण्यात येत आहे. तथापि, महाविद्यालयाने प्रचलित प्रवेश नियम पद्धती डावलून हा प्रवेश दिला असल्याची बाब स्पष्ट आहे. महाविद्यालयाच्या या निष्काळजीपणाबाबत त्यांनी प्रथम वर्षात स्विकारलेल्या एकुण शुल्काच्या ५०% अर्थात रुपये १७ लाख एवढया रकमेचा दंड आकारुन, डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी यांचा प्रवेश मान्यतेचा निर्णय घेण्यात येत आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा "६०२४९४८१३२१" (IFSC Code : MAHB०००००३१०) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे त्वरित भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील. सदर बाबत दंडाची पुर्तता केल्यानंतरच डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी यांच्या प्रवेश मान्यतेबाबतची पुढील कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

<u>विषय क्रमांक १०</u> : <u>कंधार कॉलेज ऑफ फार्मसी, नांदेड PH२५५९ या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र अशी त्रुटी असलेल्या कु. कुणाल मुंजाजी सोनटक्के या विद्यार्थ्याच्या प्रवेश मान्यतेबाबत.</u>

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

कंधार कॉलेज ऑफ फार्मसी, नांदेड PH२५५९ या महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र अशी त्रुटी असलेल्या

कु. कुणाल मुंजाजी सोनटक्के या विद्यार्थ्याच्या प्रवेश मान्यतेबाबत दि.२१/०१/२०२२ रोजी पुनर्विलोकन याचिका दाखल केली होती.

त्याअनुषंगाने, सदर प्रकरणी संबंधीत महाविद्यालयास दि.२३/०२/२०२२ रोजी सुनावणी देण्यात आलेली आहे. तसेच सदर सुनावणीचे दि.२२/०६/२०२२ रोजीच्या आदेशान्वये सदर याचिका रद्द करण्यात आली होती.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.२९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीतील बाब क्र. २ ड मधील निर्णयाच्या अनुषंगाने, पुनर्विलोकन याचिकांचे सुनावणी निर्णयाबाबत महाविद्यालयांच्या निवेदनांच्या अनुषंगाने, महाविद्यालयाने सादर केलेली विद्यार्थ्यांच्या त्रुटींची कागदपत्रे तपासून आवश्यक त्या शिफारशीसह सचिव, प्रनिप्रा सादर करतील असा निर्णय घेण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने, दिनांक १७/१०/२०२२ व १५/११/२०२२ रोजीच्या पत्राने संबंधीत संचालकांकडून कालबद्ध पडताळणी कार्यक्रम आयोजित करुन, पत्रात नमूद केलेल्या SOP प्रमाणे अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने, संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी दिनांक २१/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कु. कुणाल मुंजाजी सोनटक्के या विद्यार्थ्याने जात वैधता प्रमाणपत्र प्रवेश बंद दिनांकानंतरचे असल्यामुळे सदर विद्यार्थि अपात्र असल्याबाबतचा अहवाल सादर केला आहे.

महाविद्यालयाने दिनांक ९/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

"शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेशावेळी कु. कुणाल मुंजाजी सोनटक्के या विद्यार्थ्याकडे जात वैधता प्रमाणपत्र नव्हते, तद्नंतर सदर विद्यार्थ्यास दिनांक १६/१२/२०२१ रोजीचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. सदर विद्यार्थ्याचा प्रवेश GOPENH या Seat Type वर झालेला आहे. सद्यस्थितीत सदर विद्यार्थ्याने पदवी अभ्यासक्रम पुर्ण केलेला आहे. परंतू, प्राधिकरणाच्या मान्यतेअभावी विद्यापीठाने सदर विद्यार्थ्याचे अंतिम गुणपत्रक व पदवी प्रमाणपत्र राखुन ठेवलेले आहे. विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित विचारात घेता सदर विद्यार्थ्याच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता देण्याबाबत विनंती केली आहे."

**<u>प्राधिकरणाचा निर्णय.-</u>**

वरील बाबींवर सांगोपांग चर्चा करुन, सदर महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेशित कु. कुणाल मुंजाजी सोनटक्के या विद्यार्थ्याच्या प्रवेशास मान्यता देण्यात येत आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | अभ्यासक्रम | विद्यार्थ्याचे नाव | राखीव प्रवर्ग | प्रवेशित प्रवर्ग | प्राधिकरणाचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र | कु. कुणाल मुंजाजी सोनटक्के | OBC | GOPENH | प्रवेश मान्य |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक ११ : यादवराव तासगावकर अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संस्था, कर्जत DSE३१४७ या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी या अभ्यासक्रमास जात वैधता प्रमाणपत्राची त्रुटी असलेल्या कु. आदित्य हेमंत सुतार या विद्यार्थ्याच्या प्रवेश मान्यतेबाबत.**

कु. आदित्य हेमंत सुतार यांचे दिनांक २२/०४/२०२५ रोजीचे Request for Issuance of Semester ८ Marksheet - Completed Computer Engineering या विषयाचे ईमेल संदेश व यादवराव तासगावकर अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संस्था, कर्जत DSE३१४७ या महाविद्यालयाचे दिनांक १५/०५/२०२५ रोजीचे पत्रास अनुसरुन सादर.

यादवराव तासगावकर अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संस्था, कर्जत DSE३१४७ या महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी या अभ्यासक्रमास जात वैधता प्रमाणपत्र अशी त्रुटी असलेल्या कु. आदित्य हेमंत सुतार या विद्यार्थ्याच्या प्रवेश मान्यतेबाबत दिनांक ९/१२/२०२२ रोजी पुनर्विलोकन याचिका दाखल केली होती.

सदर प्रकरणी संबंधीत महाविद्यालयास दिनांक ०८/०२/२०२३ रोजी सुनावणी देण्यात आलेली आहे. तसेच सदर सुनावणीचे दिनांक ०२/०३/२०२३ रोजीच्या आदेशान्वये सदर याचिका रद्द करण्यात आली होती.

त्याअनुषंगाने, सदर महाविद्यालयाने दिनांक १५/०५/२०२५ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे विनंती केली आहे,-

> कु. आदित्य हेमंत सुतार या विद्यार्थ्याने दिनांक २०/०१/२०२२ रोजीचे जात वैधता सादर केलेले असल्याने सदर विद्यार्थ्याच्या प्रवेशास मान्यता देण्यासाठी विनंती करत आहेत. तसेच, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या प्रवेश प्रक्रियेदरम्यान, प्रवेश कालावधीत CET द्वारे जात वैधता सादर न केलेल्या या विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करण्यात आला नाही किंवा खुल्या श्रेणीत रूपांतरित करण्यात आला नाही. प्राधिकरणाकडे पुनर्विलोकन याचिकाबाबत दिनांक ८/०२/२०२३ रोजी सुनावणी झाली त्यावेळी सदर विद्यार्थ्याने तिसऱ्या वर्षाचे पाचवे सत्र आधीच पूर्ण केले होते.

अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य

तसेच, कु. आदित्य हेमंत सुतार या विद्यार्थ्याने २२/०४/२०२५ रोजीचे ईमेलद्वारे खालीलप्रमाणे विनंती केली आहे,-

> सदर विद्यार्थ्याने त्याचे ८ व्या सत्राचे मार्कशीट मिळणेबाबत विनंती केली आहे. तसेच, सदर विद्यार्थ्याने कोविड काळात थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अर्ज केला होता, कागदपत्रांची ऑनलाइन पडताळणी दरम्यान महाविद्यालयाने चुकून जात वैधता प्रमाणपत्राऐवजी जात वैधतेच्या पावतीच्या आधारे अर्ज मंजूर केला. महाविद्यालयाने माहिती दिल्यानुसार जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर प्रमाणपत्र सबंधीत महाविद्यालयात सादर केले आहे.

थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या सर्व परीक्षा दिल्या आहेत, प्रत्येक सेमिस्टर उत्तीर्ण आहेत. प्राधिकरणाच्या मान्यतेअभावी संबंधीत विद्यापीठाकडून शेवटच्या सेमिस्टर ८ ची मार्कशीट जारी करणे बाकी आहे. सदर विद्यार्थि नोकरीच्या प्रशिक्षण टप्प्यात आहे आणि ८ व्या सत्राचे मार्कशीटची तातडीने आवश्यकता असल्याने, सदर मार्कशीट जारी करण्याबाबत विद्यार्थ्याने विनंती केली आहे.

सदर प्रकरणी, कु. आदित्य हेमंत सुतार हा विद्यार्थी OBC या राखीव प्रवर्गाचा आहे, त्याचा प्रवेश Seat Type - GOBC मधून झालेला आहे. तसेच, सदर विद्यार्थ्यास दिनांक २०/०१/२०२२ रोजीचे OBC जातीचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. परंतू, सदर प्रमाणपत्र प्रवेश बंद दिनांकानंतरचे आहे. (प्रवेश बंद दिनांक - २९/१२/२०२१)

सद्यस्थितीमध्ये सदर विद्यार्थ्याने थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या सर्व परिक्षा दिलेल्या आहेत. तसेच सदर विद्यार्थी नोकरीच्या प्रशिक्षण टप्प्यात आहे. तसेच सदर विद्यार्थ्यास जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. सदर विद्यार्थ्याचे पात्रता गुण - ८५.०३% असल्याने सदर विद्यार्थि गुणवत्तेनुसार OPEN खुल्या प्रवर्गाच्या प्रवेशास पात्र आहे. तसेच विद्यार्थ्याने दिनांक २०/०१/२०२२ रोजीचे OBC जातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

**प्राधिकरणाचा निर्णय.-**

उपरोक्त प्रकरणी सांगोपांग चर्चा करण्यात आली. कु. आदित्य हेमंत सुतार हा OBC प्रवर्गाचा असून त्याचा प्रवेश Seat Type- GOBC जागेवर झालेला आहे. सदर विद्यार्थ्याचा प्रवेश निश्चित करताना महाविद्यालयाने त्या विद्यार्थ्याचे जात वैधता प्रमाणपत्र तपासून प्रवेश देणे प्रवेश नियमातील तरतुदींनुसार क्रमप्राप्त होते. महाविद्यालयाने संबंधित विद्यार्थ्याचे जात वैधता प्रमाणपत्र न तपासता प्रवेश दिलेला आहे, याबाबत महाविद्यालयाकडून निष्काळजीपणा झाल्याचे दिसून आले.

महाविद्यालयाच्या या निष्काळजीपणाबाबत रुपये १.० लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा "६०२४९४८१३२१" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे निर्णय संबंधित व्यक्ती/संस्था यांना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

विद्यार्थ्याचे पात्रता गुण - ८५.०३ लक्षात घेता व विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान लक्षात घेऊन, त्याच्या प्रवेशास उपरोक्त दंडाची रक्कम भरण्याच्या अधिन राहून प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ.क्र. | अभ्यासक्रम | विद्यार्थ्याचे नाव | राखीव प्रवर्ग | प्रवेशित प्रवर्ग | प्राधिकरणाचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| १ | थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी | कु. आदित्य हेमंत सुतार | OBC | GOBC | प्रवेश मान्य |

**विषय क्रमांक ६ : मान. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

**(क) श्री. जयंत मोतीराम पाटील, विशेष कार्य अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांना ११ महिन्यांची मुदतवाढ देण्याबाबत.**

श्री. जयंत मोतीराम पाटील हे दिनांक ०१/०७/२०२४ ते दिनांक ३१/०५/२०२५ या ११ महिन्यांच्या कालावधीकरिता कंत्राटी पध्दतीवर विशेष कार्य अधिकारी या पदावर प्रति महिना ठोक रु. ५०,०००/- इतक्या पारिश्रमिकावर नियुक्ती देण्यात आलेली होती.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील उच्च शिक्षण विभागातील सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया कामाचा व्याप लक्षात घेता, आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी दिनांक २८/०५/२०२५ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये श्री. जयंत मोतीराम पाटील यांच्या कंत्राटी पध्दतीवरील विशेष कार्य अधिकारी या पदावर दिनांक ०१/०६/२०२५ ते दिनांक ३०/०४/२०२६ पर्यंत ११ महिन्यांच्या कालावधीकरिता प्रति माह ठोक रु. ५०,०००/- इतक्या पारिश्रमिकावर मुदतवाढ देण्यात आली. यास प्रवेश नियामक प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(समीर कुमार बिस्वास, भा.प्र.से.(से.नि.))
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 20 JUN 2025